# प्रेमानंद 'बी' सहकारी गृहरचना संस्था (मर्यादीत)

प्लॉट नं. ९९२, सब प्लॉट नं. ३० भाग, राजेंद्रनगर, नवी पेठ, पुणे ४११०३०

दिनांक : १४/०९/२०२३

## पहिली सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत

संस्थेची पहिली सर्वसाधारण सभा गुरूवार दिनांक ३१/०८/२०२३ रोजी सायंकाळी ५ (पाच) वाजता इंद्रधनुष्य सभागृह, तेंडुलकर गार्डन समोर, राजेंद्रनगर, पुणे – ४११०३० येथे भरविणेत आली होती.

मुख्य प्रवर्तक दिपक ढेलवान यांनी उपस्थित असलेल्या सर्व सभासदांचे स्वागत केले व सभेचे कामकाजास सुरूवात केली.

**विषय क्र. १ :** सभेसाठी अध्यक्षाची निवड करणे.

**ठराव क्र. १ :** सभेसाठी अध्यक्षांची निवड करणे या विषयावर सूचक श्री. संदिप इनामदार, अनुमोदक श्री. प्रविण फडणीस यांनी पहिल्या सर्वसाधारण सभेसाठी अध्यक्ष म्हणून श्री. उदय सोनाळकर यांची निवड करावी अशी उपसूचना दिली. त्यास सभेस उपस्थित असलेल्या सर्व सभासदांनी त्यास मंजुरी दिली. त्यानुसार अध्यक्ष श्री. उदय सोनाळकर यांनी सभेचे कामकाज सुरु करावे असे श्री.दिपक ढेलवान यांना सांगितले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्री. हेमंत मांडके — अनुमोदक : श्री. नारायण विचारे

**विषय क्र. २ :** प्रेमानंद 'अे' व 'बी' सहकार गृहरचना संस्था मर्या. यांचे विभाजनाची माहिती सादर करणे

**ठराव क्र. २ :** मुख्य प्रवर्तक दिपक ढेलवान यांनी मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (२) यांनी दि.३१/०७/२०२३ रोजीचे विभाजनाबाबतचे आदेशाचे संपूर्ण वाचन करून उपस्थित सभासदांना माहिती दिली व त्यावर चर्चा करण्यात आली. सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्री. चंद्रशेखर केंदळे — अनुमोदक : श्रीमती साधना संगावार

**विषय क्र. ३ :** हंगामी कार्यकारीणी समितीची आदेशानुसार नियुक्ती करणे.

**ठराव क्र. ३ :** हंगामी कार्यकारीणी समितीची आदेशानुसार नियुक्ती बाबत विशेष सर्वसाधारण सभा दि.२१/०३/२०२३ रोजीच्या ठराव क्र. ०२ दि.२१/०३/२०२३ रोजीच्या संस्थेच्या विभाजनानंतरची हंगामी कार्यकारीणी समितीची खालील नावे १) अजय गायकवाड, २) प्रसाद वाळुंजकर, ३) कार्तिक वकील, ४) मिलिंद कुलकर्णी, ५) संदीप इनामदार, ६) श्रीमती लता पाटणकर, ७) श्री. चंद्रशेखर केंदळे, ८) श्री. प्रविण फडणीस, ९) श्री. दिपक ढेलवान ही नावे मंजुर करण्यात आली होती. तसेच मा.उपनिबंधक यांचे दि.३१/०७/२०२३ रोजीचे निवेदनामध्ये ही नावे नमुद केलेली आहेत. यामध्ये श्री. नारायण विचारे यांचे नाव हंगामी कार्यकारीणी समितीमध्ये समाविष्ट करण्यात यावे, असे

# प्रेमानंद 'बी' सहकारी गृहरचना संस्था (मर्यादीत)

प्लॉट नं. ९९२, सब प्लॉट नं. ३० भाग, राजेंद्रनगर, नवी पेठ, पुणे ४११०३०

सभासद दिनेश पाटील यांनी सुचविण्यात आले. उपस्थित सर्व सभासदांनी सदरचा विषय साधक-बाधक चर्चा करून मान्य करण्याचे ठरले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्री. कार्तिक वकील अनुमोदक : श्री. शशिकांत पटवर्धन

**विषय क्र. ४ :** संस्थेचे अधिकृतरित्या विभाजनानंतर होणाऱ्या कार्यवाहीस मान्यता देणे. (भागभांडवल, ठेवी, देणी देणे इत्यादी.)

**ठराव क्र. ४ :** संस्थेचे अधिकृतरित्या विभाजनानंतर होणाऱ्या कार्यवाहीस (भागभांडवल, ठेवी, देणी देणे इत्यादी.) या विषयावर चर्चा होऊन सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्री. हेमंत चौधरी अनुमोदक : श्री. दिनेश पाटील

**विषय क्र. ५ :** संस्थेचे सन २०२२-२३ चे लेखापरिक्षण अहवालावर चर्चा करणे.

**ठराव क्र. ५ :** संस्थेचे सन २०२२-२३ चे लेखापरिक्षण अहवालावर साधक-बाधक चर्चा करून मान्य करण्याचे ठरले तथापि ०१ एप्रिल २०२३ ते ३१ ऑगस्ट २०२३ अखेरपर्यंत खर्चाचा अहवाल या सभेस उपलब्ध न केल्याने त्याचे कारण मुख्य प्रवर्तक श्री. दिपक ढेलवान यांनी काही धनादेश बँकेत अद्यापी पास होणे असल्याकारणाने याचा खर्चाचा अहवाल अलाहीदा सभासदांना सादर करणेत येईल असे सांगितले व सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्री. अजय गायकवाड अनुमोदक : श्रीमती लता पाटणकर

**विषय क्र. ६ :** संस्थेचे नावाने नवीन बँक खाते उघडणे.

**ठराव क्र. ६ :** संस्थेचे नावाने नवीन बँक खाते उघडण्याबाबत चर्चा करण्यात आली व आर्थिक व्यवहाराच्या सोईसाठी पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेत खाते उघडण्यास मान्य करण्याचे ठरले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्री. नारायण विचारे अनुमोदक : श्री. किरण देशपांडे

**विषय क्र. ७ :** संस्थेच्या नावाने आवश्यक असणारी कार्यवाहीस मंजुरी देणे. (पॅन कार्ड, बँक खाते, दप्तर तयार करणे इत्यादी)

**ठराव क्र. ७ :** संस्थेच्या नावाने आवश्यक असणाऱ्या कार्यवाहीवर चर्चा करून (पॅन कार्ड, बँक खाते, दप्तर तयार करणे इत्यादी) करीता येणाऱ्या खर्चास मान्यता देण्याचे ठरले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्री. शेखर केंदळे अनुमोदक : श्री. प्रविण फडणीस

**विषय क्र. ८ :** संस्थेच्या वतीने संस्थेच्या पुनर्विकास कामासंबंधी सह्या करणेचे अधिकार अध्यक्ष, सचिव यांना देणे.

**ठराव क्र. ८ :** संस्थेच्या वतीने संस्थेच्या पुनर्विकास कामासंबंधी सह्या करणेचे अधिकार मा. अध्यक्ष व मा. सचिव यांना देणेबाबत साधक बाधक चर्चा झाली व विकसन करारावर

सर्व सभासदांच्या स्वाक्षरी घेण्यात येईल असे मुख्य प्रवर्तक श्री.दिपक ढेलवान यांनी सांगितले. वरील सर्व बाबींचा साधक-बाधक चर्चा करून सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्री. अजय जमदाडे अनुमोदक : श्रीमती पुष्पलता सगरी

**विषय क्र. ९ :** सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे.

**ठराव क्र. ९ :** सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी लेखापरिक्षकाची नियुक्ती मा. उपनिबंधकाच्या पॅनलवरील असणारे श्री. बाळासाहेब मुळुक यांची नियुक्ती करणे बाबत साधक-बाधक चर्चा करून सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्रीमती गितांजली वैद्य अनुमोदक : श्री. मिलींद कुलकर्णी

**विषय क्र. १० :** कार्यकारीणी सभा बोलाविण्याचा अधिकारी कार्यकारीणी सदस्यास देणे.

**ठराव क्र. १० :** कार्यकारीणी सभा बोलाविण्याचा अधिकारी कार्यकारीणी सदस्यास देणे बाबत चर्चा करण्यात आली. व सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्रीमती रंजना गांजवे अनुमोदक : श्री. संदीप इनामदार

**विषय क्र. ११ :** मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयाचा विचार करणे.

**ठराव क्र. ११ :** आयत्यावेळी कोणताही विषय न आल्याने मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्री. दिनेश पाटील अनुमोदक : श्री. हेमंत चौधरी

*****

सभा अध्यक्ष

प्रेमानंद बी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित